UGC Care Listed Journal
ISSN-0976-5425


मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद

# History Research Journal

Issue - XXVII

# इतिहास संशोधन पत्रिका

अंक सत्ताविसावा



कार्यकारी संपादक

डॉ. सोमनाथ रोडे

Scanned by CamScanner

UGC Care Listed Journal

**मराठवाडा इतिहास परिषद,**
**औरंगाबाद**
(रजि.नं. एफ ८२० / दि. २६.०८.१९८२)

**ISSN : 0976 – 5425**

# History Research Journal

# इतिहास संशोधन पत्रिका

**Issue. - XXVII** **January 2022**
अंक - सत्तावीस

कार्यकारी संपादक

**डॉ. सोमनाथ रोडे**

: संपादकीय मंडळ :

डॉ. जाकेर पठाण | प्रा. विजय पांडे
डॉ. सुभाष बेंजलवार | डॉ. नारायण सूर्यवंशी
डॉ. प्रभाकर मिरकड | डॉ. विनोद बोरसे
डॉ. बब्रुवान मोरे

या अंकात व्यक्त केलेली विचार-मते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

UGC Care Listed Journal

History Research Journal

इतिहास संशोधन पत्रिका

Issue. - XXVII January

अंक - सत्तावीस 2022

ISSN : 0976 – 5425

☼ प्रकाशक :

प्रा. विजय पांडे

सचिव, मराठवाडा इतिहास परिषद

श्री संत सावता माळी महाविद्यालय, फुलंब्री

जि. औरंगाबाद भ्रमणध्वनी - ९४२२७ २३२७७

☼ मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद

☼ संपर्क :

प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे

कार्यकारी संपादक

४ - शारदानगर, अंबाजोगाई रोड, लातूर

पीन : ४१३ ५३१ फोन : ०२३८२ - २२८०९०.

भ्रमणध्वनी : ९४२१४ ८३६११, ७५१७९ ८५६९०

☼ मुखपृष्ठ छायाचित्रे - डॉ. प्रविण चव्हाण,सिल्लोड,औरंगाबाद

☼ मूल्य : रु. २००/-

पंचवार्षिक वर्गणी रु. १,०००/-

दशवार्षिक वर्गणी रु. २,०००/-

☼ प्रकाशन दि. ०७ जानेवारी २०२२

☼ अक्षर जुळवणी व मुद्रक :

विद्याभारती प्रकाशन

गुजराती शाळेजवळ, मेन रोड,

लातूर - ४१३ ५१२

The publication of the MSS/ Journals/Proceedings- financially supported by the Indian Council of Historical Research and the responsibility for the facts, stated, options expressed and conclusion researched is entirely that of the author/ authors of the articles and the Indian Council of Historical Research accepts no responsibility for them.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शिर्षक |
|---|---|---|---|
| | **प्राचीन विभाग** | | |
| १. | Shri. Ravi Dinkar Khillare | १५ | The Significant Role of Third Buddhist Council for the Propagation Buddhism in the Deccan |
| २. | डॉ. अतुल नारायण खोटे | २५ | प्राचीन भारत आणि भारतीय लोकसभेची निर्मिती प्रक्रिया |
| ३. | डॉ. विजय सरडे | ३३ | तीर्थ बुद्रुक येथील सातवाहनकालीन पुरावशेष |
| ४. | श्री. कृष्णा त्रिंबक गुडदे | ४० | धर्मापुरी शिलालेख |
| ५. | डॉ. ज्योती रामराव रामोड | ४४ | प्राचीन काळातील आदिवासींचे धार्मिक जीवन |
| ६. | श्रीमती सुवर्णरेखा देवधर डॉ. मंजिरी भालेराव | ५० | मत्स्य, कूर्म व वराह ही ब्रह्मदेवाचीच रूपे : एक अभ्यास |
| ७. | डॉ. नारायण सूर्यवंशी | ५७ | लत्तलूरपूरचे राष्ट्रकुट : एक शोध |
| | **गोषवारा** | | |
| १. | डॉ. शीला स्वामी | ६२ | अचलेर येथील शिवालये |
| २. | श्रीमती नेहा वामनराव मोरतळे | ६५ | ऐतिहासिक काळातील आभूषणे : एक अभ्यास |
| ३. | डॉ. संजय कुमार सिंह | ६८ | मूर्तिकला में गणेश की प्रतीकात्मक अभिव्यक्तियाँ |





Scanned by CamScanner

| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शिर्षक |
|---|---|---|---|
| | **मध्ययुगीन विभाग** | | |
| १. | डॉ. ज्योती पेठकर | ७३ | १७३३ ते १७३६ या काळातील सिद्दी - मराठे संघर्षात बाणकोट (हिंमतगड) चे महत्त्व |
| २. | Dr. Nalini A. Waghmare | ८३ | Istalinga Worship and its Relevance |
| ३. | Yassar Kaleem Ahmad Siddiqui<br>Dr. Z. A. Pathan | ९३ | Medieval Urban Water Heritage of Aurangabad City and Daulatabad Fort under Malik Ambar |
| ४. | प्रा. धनश्री रामचंद्र कापशीकर<br>डॉ. अरविंद पी. सोनटक्के | १०१ | शिवकालीन युद्धविद्या - गनिमी कावा |
| ५. | डॉ. विजया साखरे | १०९ | महात्मा बसवेश्वरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन |
| ६. | श्री. प्रभाकर नारायण शिंदे | ११५ | संत नामदेव आणि उत्तर भारतीय संत : एक अध्ययन |
| ७. | श्रीमती दीपिका हिम्मत पवार | १२५ | मराठवाड्यातील वारकरी संप्रदाय आणि समाजसुधारणा चळवळ |
| ८. | डॉ. दिनेश आर. कचकुरे | १३१ | मराठेशाहीचे लष्कर आणि तत्कालीन प्राकृतिक पर्यावरण |
| | **गोषवारा** | | |
| १. | श्री. ओजस देवीदास बोरसे | १३७ | आंबापाणीच्या रोमहर्षक युद्धात आदिवासींचे योगदान |
| २. | श्री. कृष्णा बबनराव काळे | १४० | मानवता धर्माचे उपासक संत एकनाथ महाराज |
| ३. | श्रीमती सिंधू निवृत्ती लोणकर | १४३ | महाराष्ट्रातील अस्पृश्यांची स्थिती (विशेष संदर्भ : पेशवेकाळ) |
| ४. | डॉ. एस. डी. सावंत | १४५ | छत्रपती शिवाजी महाराजांचे आग्र्याहून सुटकेनंतरचे वास्तव्य : मनोहरगड |




Scanned by CamScanner

४

# शिवकालीन युद्धविद्या - गनिमी कावा

**प्रा. धनश्री रामचंद्र कापशीकर**
संशोधक विद्यार्थिनी,
उमा महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर

**डॉ. अरविंद पी. सोनटक्के**
संशोधन मार्गदर्शक,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर

१७ व्या शतकात महाराष्ट्राचा महानायक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांनी यवनी सत्तांच्या विरोधात निद्रिस्त समाजाला जागे केले. हा समाज अन्याय, जुलूम व संकटग्रस्त होता. म्हणून स्वराज्यप्रेम, समाजहिताची जाणीव, त्यागाची वृत्ती या समाजात निर्माण करुन त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यामागे युद्धतंत्राचा आणि दुर्गांचा विचार होता. शिवरायांच्या कर्तृत्वाचा इलाखा म्हणजे 'दख्खन' होय. दख्खन, सह्याद्री आणि सह्याद्रीतील घाटवाटा हेच त्यांनी केलेल्या राजकीय परिवर्तनाचे केंद्र होते.

**सह्याद्री आणि घाटवाटा :-**

मानवी जीवनाच्या प्रारंभापासूनच दुर्ग, पहाड, नद्या-खोरे, वाळवंट, अरण्ये, सागर यातून मार्ग मानवाने शोधले. मध्ययुगीन काळात मात्र राजकीय आणि व्यापारी दृष्टीने अनेक नवनवीन मार्ग शोधण्यात आले. मात्र हे मार्ग जंगल, दुर्गम पहाड, वाळवंट, डोंगर, घाट यांतूनच जात असत. सैन्य, प्रवासी, साधुसंत, राजे-रजवाडे अशा सर्वांचेच मार्गक्रमण सोपे नव्हते. अनंत अडचणींतून आणि हिंस्त्र पशूंना तोंड देत हा प्रवास अविरत चालू होता. या अडचणींचा विचार करून अनेक राजांनी किंवा स्थानिक पातळीवरील वतनदारांनी रस्त्याच्या कडेला विहिरी, तळी बांधली. त्या काळात बैलगाडी, घोडे, उंट, गाढव अशा प्रकारची दळणवळणाची साधने असल्यामुळे पाण्याची सोय करणे आवश्यक होते. रथ आणि पालखी ही देखील साधने होती; परंतु सह्याद्रीच्या डोंगरात आणि घाटवाटात त्यांचा काही उपयोग नसे. म्हणूनच छत्रपती शिवरायांनी सह्याद्रीच्या पर्यावरणाचा, पावसाळा, हिवाळा, उन्हाळा या ऋतूंमधील दख्खनमधील वातावरणाचा विचार केला. मावळ्यांची ताकद, घोडे व गनिमी कावा हे युद्धतंत्र यांचा वापर करुन सह्याद्रीच्या डोंगररांगांत मराठी राज्याची निर्मिती त्यांनी केली. त्या वेळी त्यांनी दुर्गांचाही आधार घेतला.



Scanned by CamScanner

महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावरील कल्याण, सोपारा, चौल, बाणकोट, दाभोळ, देवगड या बंदरांतून परदेशांशी मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. घाटमाथ्यावर पैठण, नाशिक, देवगिरी, कऱ्हाड ही व्यापारी शहरे होती. या दोन्हींच्या मध्ये सह्याद्री उभा आहे. मानवाने कोकणात उतरण्यासाठी रस्ता म्हणजेच घाट तयार केला. गरज असेल तेव्हा कातळ सुद्धा फोडून काढून कोकणातून घाटमाथ्यावर असंख्या घाटवाटा निर्माण केल्या.

महमूद गवान इ. स. १४७० मध्ये कोकण मोहिमेवर असताना बहामनीच्या एका वजिराला लिहितो की, कोकणच्या मोहिमेच्या अडचणी तुम्ही जाणता, कोकण म्हणजे जंगल आणि डोंगर, जंगल झाडी तोडणे व खडक फोडून रस्ते बरोबर करणे, याशिवाय येथे पुढे पाऊल टाकणे अशक्य आहे, त्यामुळे येथे किती तयारी करावी लागते याची कल्पना आपल्याला येईल.[१]

महाराष्ट्र हा नैसर्गिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण प्रदेश आहे. सह्याद्री, सातपुडा या दोन पर्वतप्रणाली आणि महाराष्ट्र पठार ही महाराष्ट्राची खरी प्राकृतिक रचना आहे. सह्याद्री म्हणजेच पश्चिम घाट ही डोंगररांग आहे. सुमारे १६०० कि. मी. लांबीची ही डोंगररांग तापी नदीच्या दक्षिणेकडून व महाराष्ट्र-गुजरातच्या सीमेलगत चालू होते. तेथून महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू व केरळ या राज्यांतून भारताच्या दक्षिण टोकाकडे पोहोचते. या डोंगररांगेचा ६० % भाग हा कर्नाटकात येतो. हाच भारताचा दख्खन होय. या डोगररांगेचे क्षेत्रफळ आठ हजार चौरस कि. मी. असून अनेक उंच शिखरे आहेत. कळसूबाई शिखराची उंची १६४६ मी. इतकी आहे. कर्नाटकात १६८२ मी. उंचीवर कुद्रेमुख शिखर आणि केरळमध्ये अनाईमुदी शिखर त्याची उंची २६९५ मी. आहे. भारताचा हा दख्खन भाग व सह्याद्रीचा पश्चिम घाट आहे. पश्चिम घाट ही रांग दख्खनच्या पठरातून निर्माण झालेली कडा आहे. उत्तरेला सातपुडा रांगेपासून सुरु झालेल्या सह्याद्रीच्या पर्वतरांगेमध्ये महाराष्ट्रातील माथेरान, महाबळेश्वर, पाचगणी ही ठिकाणे येतात. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या मधोमध गोवा खिंड आहे आणि दुसरी पालघाट खिंड आहे. पश्चिम घाट आणि अरबी समुद्र यांच्यामधल्या चिंचोळीपट्टीच्या उत्तरेकडील सपाट भागास कोकण व दक्षिणेला मलवार असे म्हणतात. सह्याद्रीच्या पायथ्याशी पूर्वेकडे असलेल्या भागाला महाराष्ट्र म्हणतात.[२]



Scanned by Cam

युद्धनीती :-

देशाच्या, समाजाच्या, संस्कृतीच्या अभ्यासात 'युद्धविद्या' हा अतिशय महत्त्वाचा घटक असतो. शस्त्रबलाने देशाचे व समाजाचे रक्षण व्हावे लागते. यवनी संतांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अत्याचारातून १७ व्या शतकात महाराष्ट्राला सोडविण्यासाठी शिवरायांनी महाराष्ट्राच्या मातीत युद्धविद्येचे नवीन तंत्र जोपासले व महाराष्ट्र संस्कृतीचे रक्षण केले.

'बुधभूषणम्' या ग्रंथात छत्रपती संभाजी हे राजाच्या युद्धनीतीबद्दल सांगतात. "स्वत:च्या भूमीतील शत्रूंच्या अनुयायांची कत्तल करून द्वेष करणाऱ्या उत्तम राजाच्या राज्यात प्रवेश करावा. उंच सखल भूमीवर राजाने आपल्या सैन्यासह जावे. ग्रीष्म ऋतूमध्ये प्रचंड उन्हाळा असताना राजाने सैन्यासोबत हत्ती नेऊ नयेत, नेल्यास हत्तीच्या निवासाची व पाण्याची सोय करावी. उन्हाळ्यातील उन्हामुळे हत्तींना कुष्टरोग होतो. राजाने चौफेर हल्ला करून हळूहळू आपले सैन्य कामास लावावे, माहितगाराच्या सल्ल्यानुसार शत्रूप्रदेशात प्रवेश करावा. शहराच्या चारही बाजूंनी चार दरवाजे असलेल्या शहरांत धोका अधिक असतो. राजाचा महाल तट, राजमार्ग, खंदक यांनी वेढलेला असतो. भूमी प्रदेश लक्षात घेऊन सैन्याची व्यूहरचना करावी. वेगवान घोडे सोबत ठेवावेत. शत्रूच्या सर्व भूमीचा नाश करावा. कधी काटेरी झुडुपांनी तर कधी टोकदार खिळ्यांनी आणि गुप्त तऱ्हेचे आवरण पसरून रस्ता दोषयुक्त करावा."[३]

महाभारतात भीष्म युधिष्ठिरांस युद्धनीती सांगतो - जर शस्त्र तयार असेल तर योद्ध्यांनी शत्रूशी युद्धाचा निश्चय केला असेल तर चैत्र किंवा मार्गशीर्ष पौर्णिमेला सेनेला युद्धासाठी उद्युक्त करून प्रस्थान करणे उत्तम मानले आहे. कारण त्या वेळी शेतात पिके तयार झालेली असतात, पाणी मुबलक असते, हवामान शोषिक असते, वनाच्या जवळ छावणी असल्यास आपत्तीच्या वेळी लपण्याची सुविधा असते. जी भूमी दुर्गम, अधिक गवत बांबू व डोंगररांगानी भरलेली आहे ती भूमी अधिक योग्य मानली जाते.[४]

कौटिल्याने अर्थशास्त्रात युद्धासंबंधी म्हटले आहे की, शत्रू येण्याचा संभव असलेल्या मार्गात विहिरी, झाकलेले खड्डे आणि तारा ठेवाव्यात. मद्यपान, मेळावे, जुगार यांना बंदी करावी. मार्गातील गावे व अरण्ये या ठिकाणी करावयाचे मुक्काम, गवत, लाकूडफाटा, पाणी उपलब्ध होईल या अनुषंगाने निश्चित करून मग स्वारीवर निघावे. नदीच्या उतारावरील



Scanned by CamScanner

जागा शत्रूच्या ताब्यात असल्यास हत्ती व घोडे यांच्या साह्याने दुसऱ्या ठिकाणावरून छापा करावा. आपल्या सैन्याच्या सर्व गोष्टी गुपित ठेवाव्यात. जेथे राखीव सैन्य ठेवले असा दुर्ग पिछाडीला राहील याची काळजी घेऊन स्वत:स अनुकूल भूमीवर युद्ध करावे, तळ ठोकावा. नैसर्गिक ऋतूंविषयी खबरदारी घेऊन युद्धाचे डावपेच करावेत. शत्रूला त्याच्यासाठीच्या प्रतिकूल भूमीवर आणावे, शत्रूसैन्याची भक्कम फळी फोडावी व नंतर त्यास मारा करावा. रात्री हल्ला करुन शत्रू सैन्याला जागे ठेवल्यानंतर ते पेंगले अथवा झोपले असता दिवसा हल्ला करावा. दिवसभर चिलखत धारण केल्यामुळे दमलेल्या शत्रूवर दुपारी हल्ला करावा. राखीव सैन्य असल्याशिवाय राजाने लढू नये.'[५]

छत्रपती शिवरायांनीसुद्धा सह्याद्रीच्या व सातपुड्याच्या कुशीत असलेल्या महाराष्ट्राला योग्य अशी युद्धनीती दिली त्या वेळी महाराष्ट्राची भौगोलिकता व नैसर्गिकता त्यांच्या डोळ्यापुढे नक्कीच होती, ती म्हणजे गनिमी कावा. याच युद्धनीतीने पित्याच्या स्वराज्य संकल्पनेची प्रेरणा घेऊन शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले. पुणे जहांगिरीतील मावळ्यांचे संघटन करुन त्यांच्या पराक्रमाने ही युद्धनीती त्यांनी विकसित केली.

**गनिमी कावा युद्धतंत्र :-**

गनिमी कावा युद्ध पद्धतीला 'गुरीला वॉर टेक्निक' असे म्हटले जाते. गुरीला हा शब्द 'Guer' या फ्रेंच शब्दापासून तयार झालेला असून 'Guer' म्हणजे 'लढाई' होय. शत्रूस समोरासमोर युद्ध न करता विविध पद्धतींनी छुपे हल्ले करुन शत्रूची ताकद क्षीण करण्याचा मार्ग अनुसरुन केला जाणारा संघर्ष म्हणजे गुरीला युद्धपद्धती. प्रथम ही पद्धती स्पेनमध्ये वापरली. रोमन सम्राज्याच्या विरोधात काही जमातींनी संघटित प्रतिकार केला. त्यास 'गुरीला वॉर' हे संबोधन प्राप्त झाले. कालांतराने या पद्धतीत सुधारणा झाल्या.

'गनिमी' हा शब्द फारसी भाषेतील असून 'कावा' हा शब्द फसवणूक व कपट या अर्थी आहे[६] व 'गनिमी कावा' ही संज्ञा मराठ्यांच्या शत्रूंनी मराठ्यांच्या युद्ध पद्धतीसाठी वापरली आहे. मराठ्यांनी जिंकलेल्या लढायांमध्ये शत्रूकडे सैन्यबळ अधिक होते. युद्धसामग्री होती तरीसुद्धा मराठे जिंकले याचा अपमान शत्रूस वाटत असे. म्हणून गनिमी काव्याने लढले म्हणून विजयी झाले. म्हणजेच गनिमी कावा हा त्यांचा शब्दप्रयोग त्यांनी वापरला नि आम्ही तो स्वीकारला.



Scanned by Cam

गनिम या शब्दाचा अर्थ लुटारू असा होता; परंतु गुरीला वॉर फेअर (Guerilla War Fare) या इंग्रजीतील शब्दप्रयोगाचा मराठीमध्ये गनिमी युद्धतंत्र असा अर्थ आहे. Guerilla War Fare हे छोट्या लढायांचे तंत्र होय.[७]

**गनिमी कावा युद्धपद्धतीची वैशिष्ट्ये :-**

शत्रूला नामोहरम करण्यासाठी, सत्ता नष्ट करुन स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ही पद्धती वापरली जाते. यांत गनिम संख्येने कमी असतात. समोरासमोर लढाई नसते. युद्धभूमी नसते. लढाईचे क्षेत्र मर्यादित नसते तर विस्तारीत असते. शत्रूला तो परिसर अज्ञात असतो, ही पद्धत वापरु शकणारे सैन्य सराईतपणे त्या परिसरात हालचाली करते यात त्यांना जनतेचे सहकार्यही मिळते. यांत शत्रू सैन्याची शक्ती कमी करून शत्रूचे खच्चीकरण केले जाते. शत्रूची संपूर्ण माहिती काढून मगच बेसावध शत्रूवर अनपेक्षित हल्ले केले जातात. ही युद्धपद्धती वापरणारे काही वेळा जाळपोळ लुटालूट करून शत्रूला त्रास देतात. सैन्यात कठोर शिस्त असल्याने गतिमानता या पद्धतीत असते. सैन्यात एकजूट ही असते. यश मिळविण्यासाठी निश्चित राजकीय ध्येय असते. अशा प्रकारच्या युद्धपद्धतीत निश्चित कालमर्यादा नसते. हे युद्ध सतत मनोधैर्य खच्ची करीत सर्वव्यापी व सर्व आघाड्यांवर खेळले जाते.

**शिवछत्रपती आणि गनिमी कावा युद्धपद्धती :-**

गनिमी काव्यात सैन्य संख्या कमी म्हणून कठीण परिस्थितीत संघर्ष चालू ठेवण्यासाठी कठोर शिस्तीची गरज छत्रपतींनी ओळखली होती. शत्रूसैन्य स्वराज्यात पिके कापून नेणे, धनधान्य लुटणे, स्त्रियांची विटंबना करणे ही कृत्ये करीत असल्याने हे सर्व टाळण्यासाठी आपल्या सैन्यात कठोर शिस्तीचे पालन आवश्यक केले होते. म्हणूनच स्वराज्य प्रेम व धन्याच्या प्रेमापोटी अनेकांनी आत्मबलिदान केले. उदा. हिरोजी फर्जंद, मदारी मेहतर, शिवा न्हावी, बाजी प्रभू इत्यादी.

गनिमी कावा युद्धपद्धतीला शिवरायांनी स्वत:च्या ज्ञान आणि अनुभवातून सक्षम नेतृत्व दिले. संघटन कौशल्य, माणसांची पारख, शत्रूची माहिती काढणे, स्वातंत्र्यावर व रयतेवर प्रेम, त्यासाठी आवश्यक युद्धकौशल्य अशा त्यांच्याच अंगच्या गुणांमुळे गनिमी कावा युद्धतंत्र त्यांनी विकसित केले. गनिमी कावा दुर्गम क्षेत्रातच लढला जातो म्हणून जनतेशी संपर्क सैन्याला ठेवावाच लागतो. त्याविषयी लष्करांला सूचना देऊनच शिवराय रणक्षेत्र निश्चित करीत.



Scanned by CamScanner

लष्कराच्या हालचाली चपळ व्हाव्यात म्हणून डामडौल न करता, बाजारबुणगे लष्करांत न घेता साधी राहणी जपणारे मराठी लष्कर होते. भाला, धनुष्यबाण, तलवार, बिचवा ही मराठ्यांनी हत्यारे. अवजड तोफखाना त्यांच्याजवळ कधीच नव्हता. भाकरी, घोड्याचे तोबऱ्याचे हरभरे, घोंगडे इतक्या कमी सामानासह ते वेगाने चपळतेने हालचाली करीत व शत्रूला दहशत बसवीत.

स्वराज्याचे स्वप्न बाळगताना शिवराय व मावळ्यांजवळ उच्च ध्येयवाद व स्वराज्याची प्रेरणा होती. आदिलशाही धनवान व स्थिर सत्ता होती. कुतुबशाही स्थिर होती, मुघल तर अतिशय बलाढ्य होते, धनवान व अफाट लष्कर बाळगणारे होते. शिवरायांनी मात्र स्वराज्याची आस व मावळ्यांची साथ यांवर गनिमी कावा युद्धनीती अनुसरून राष्ट्रीय सेना निर्माण केली. सह्याद्री आणि त्याच्या घाटवाटा मात्र त्यांच्या पाठीशी भक्कम उभ्या होत्या.

शत्रू बेसावध, गाफील असताना अचानक हल्ला करणे, अनेक वर्षे दुर्लक्षित असलेल्या शत्रूच्या ठिकाणांवर आक्रमण करणे, आपली सैन्यसंख्या कमी असूनही शत्रूला जास्त वाटावी असा आभास निर्माण करीत वाऱ्याच्या वेगाने आक्रमण तर कधी माघार याचे प्रशिक्षण त्यांनी सैन्याला दिले होते. शाहिस्तेखान छापा, सुरत लूट, पन्हाळ्याचा वेढा ही यांची उदाहरणे होत.

युद्धनियोजन हे युद्धविद्येतील महत्त्वाचे लक्षण. त्यासाठी मराठ्यांनी मैदानी लढायाही खेळल्या. उदा. साल्हेरचा संग्राम, १६७० ला मोरोपंत पेशव्यांनी रावळा-जवळा हे किल्ले घेतले. प्रतापराव गुजराने वऱ्हाडातील शिरूर कारंजा ही ठाणे लुटली इत्यादी प्रसंग.

आपल्यासाठी शत्रू प्रतिकूल ठिकाणी असेल तर त्याला आपल्यासाठी अनुकूल रणक्षेत्रावर आणणे हा छत्रपतींच्या युद्धनीतीचाच भाग होता. उदा. अफझलखान प्रसंग.

गनिमी कावा या युद्धविद्येत नेतृत्वाचे धाडस व कौशल्य ही आवश्सक गोष्ट होती. अफझलखान प्रकरणात स्वत: शिवरायांनी ते दाखविले. लाल महालात मुक्काम ठोकून असलेल्या शाहिस्तेखानाच्या समोर मोजक्या मावळ्यांसह शिरणे, भिंत फोडून प्रथम प्रवेश करणे हे धाडस फक्त छत्रपतीच करु शकतात. ५ एप्रिल १६६३ चा खानावरील छापा, कारतलबखानाची दुर्दशा हा त्यांच्या आयुष्यातील अत्यंत धाडसी संघर्ष होता.[८]


Scanned by CamScan

चपळता हा सैन्याच्या अंगचा गुण युद्धनीतीचाच भाग होता. 'तारीखे दिल्कुशा' या ग्रंथात भीमसेन सक्सेना लिहितो - शिवाजीराजे सत्पुरुष होतेच. शिपाई गडी म्हणून अद्वितीय होते. राजनीतीनिपुण होते. एकनिष्ठ सैनिकांना ते जीव की प्राण करीत. अफझलखानास मारल्यानंतर त्याचा अंगरक्षक शिवरायांवर धावून आला. चपळतेने जिवा महालाने त्याचा हात आपल्या तलवारीने उडविला. झटापटीत खानाचे सर्व अंगरक्षक मारले गेले. भोई खानास पालखीत घालणार एवढ्यात संभाजी कावजीने भोयांच्या पायावर वार करून खानाचे शिर धडावेगळे केले.[९]

अंगरक्षक व त्यांच्या शस्त्रांची सिद्धता हे राजेच्या प्रशासन व युद्धनीतीचे महत्त्वाचे अंग होते. प्रत्येक प्रसंगात अंगरक्षक सावधानता बाळगत. उदा. सुरत लुटीत इनायतखानाच्या मारेकऱ्याने शिवरायांवर तलवार उपसताच राजेंच्या अंगरक्षकाने त्याचा हात क्षणात उडवून शिवरायांचा जीव वाचविला. अंगरक्षकांच्या पथकांची विभागणी २०, ३०, ४०, ६०, १०० अशी होती. अंगरक्षक हे प्रशासनातील महत्त्वाचे अंग होते. 'जितके माणसास साज करून दिले, डोईस मंदिल, अंगास सखलादी फतू, दोहो हाती सोन्याच्या कडी, कोणास रुप्याची कडी, कानास जोडी कुड्याची, तरवारास अगनाळ तैनाळ सोने रुप्याचे, विटीयाची कट तसेच राजाच्या पालखीबरोबर असा थाट हे दृश्य अतिशय मनोहर दिले.[१०]

कडक लष्करी शिस्तीबद्दल सभासद सांगतो - लष्कराने पावसाळी विशी आपल्या देशी यावे, दसरा होताच कूच करून आठ महिने मुलूखगिरीस जावे, परमुलखी पोट भरावे, खंडण्या घ्याव्यात, लष्करात बायको, बटकी, कलावंतीण नसावी जो बाळगेल त्याची गर्दन मारावी, परमुलुखात बायका, पोरे न धरावी, मर्दाना धरावा, गायी न धरावी, ओझ्यास बईल धरावा बोलीप्रमाणे खंडणी पैका घ्यावा, बदअंमल न करावा वैशाख मासी परतोनी आपले मुलुखाचे सरदेशमुखास लष्कराचा झाडा द्यावा. राजाचे दर्शनास जावे.[११]

**निष्कर्ष :-**

(१) शिवरायांनी यवनी अत्याचाराची प्रतिक्रिया व राजकीय परिवर्तनासाठी दख्खनमध्ये गनिमी कावा युद्धनीती विकसित केली.

(२) या युद्धनीतीसाठी त्यांना सह्याद्रीच्या नैसर्गिकतेचा व पर्यावरणाचा पुरेपूर वापर करून घेता आला.

(३) स्वत: शिवरायांनी अनेकदा या युद्धनीतीत सैन्याला सक्षम नेतृत्व दिले.



Scanned by CamScanner

(४) गनिमी कावा ही युद्धविद्या लष्कराने प्रामाणिकपणे व विश्वासूपणे आत्मसा केल्याने शत्रूचे हल्ले शिवराय परतवू शकले. त्यामुळे स्वराज्य विस्तारले व स्थि झाले.

(५) चपळता, वेगवान हालचाली, हेरगिरी, शत्रूला खचवणे अशा अनेक वैशिष्ट्यां ही युद्धनीती शिवकाळात व त्यानंतरच्या काळातही सशस्वी ठरली.

(६) कडक शिस्त, पराक्रमी सैन्याचा गौरव शिवरायांच्या आदेशांचे पालन यामु लष्कर स्वामीनिष्ठ व स्वराज्यनिष्ठ बनले.

(७) मध्ययुगातील ही गनिमी कावा युद्धपद्धती विशेष गौरवास्पद ठरली.

**संदर्भ :-**

(१) अक्कलकोटे सतीश, दुर्ग, सह्याद्री दुर्ग भ्रमण मंडळ, सांगली, २००९, पृ. ११९

(२) दुधाणे सुशील, सह्याद्रीतील घाटा वाटा, नावीन्य प्रकाशन, पुणे, २०२०, पृ. ९.

(३) काकडे नभा, छत्रपती संभाजीराजे विरचित बुधभूषणम् एक चिकित्सा, चिन्म प्रकाशन, औरंगाबाद, २०१२, पृ. १२२.

(४) पाण्डेय रामनारायण दलशास्त्री (अनु.), श्री महर्षी वेदव्यासप्रणीत, 'राम' महाभार (खंड पंचम), शांती पर्व, अध्याय-९९, गीता प्रेस, गोरखपूर, उत्तर प्रदेश, पृ. ४६८

(५) कंगले र. प. (भाषा), कौटिल्य अर्थशास्त्र, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंड मुंबई, १९९५, पृ. ५१९.

(६) कुलकर्णी श्री. रं., शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मंब १९८४, पृ. १०३-१०५.

(७) मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य, साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, खंड - १ पृ. १३३.

(८) पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन, कोल्हापूर, २०१ पृ. ९६-९७

(९) उपरोक्त, पृ. ८४.

(१०) शिवदे सदाशिव, सेनापती हंबीरराव मोहिते, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०० पृ. २९.

(११) उपरोक्त, पृ. ३०.

ooo



Scanned by Ca